उत्तर मुंबई मतदार संघ



उत्तर मुंबईचा पाठिंबा विकासकामांना.. मतदान महायुतीला, मतदान मोदीजींना! महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या नमो रथ यात्रेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद हा विकासाचा दृष्टीकोन ठेवून जनतेची कामे करणार्‍यांप्रती दाखवलेला विश्वास आहे. यावेळी महायुतीचे नेते रामदास आठवले हे देखील उपस्थित होते.

उत्तर-पश्चिम मुंबई मतदार संघ



महायुतीचे उमेदवार रविंद्र वायकर यांनी हरे रामा हरे कृष्णा जुहू येथील इस्कॉन मंदिरात जाऊन कृष्ण दर्शन घेतले. येथील कृष्ण भाविकांनी आदराने स्वागत केले. जनता दाखवत असलेल्या विश्वासाला सार्थ ठरत राहण्याचे आशीर्वाद सदैव मिळत राहो, अशी प्रार्थना वायकर यांनी केली.

दक्षिण मुंबई मतदार संघ



असाही प्रचार : महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांनी प्रचार फेरीचा भाग म्हणून सेंट जोसेफ बाप्टिस्टा गार्डन, माझगाव येथे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

दक्षिण-मध्य मुंबई मतदार संघ



महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांच्या प्रचारासाठी शिवशक्ती आणि भीमशक्तीची ताकद एकवटली. चेंबूरच्या सिद्धार्थ कॉलनी परिसरात प्रचार फेरीदरम्यान शेवाळे यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

# दक्षिण-मध्य मुंबईत मविआमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

**प्रतिनिधी, मुंबई**

महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ठाकरे गट आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमधील वादामुळे दक्षिण-मध्य मुंबईचे उमेदवार अनिल देसाईंना प्रचार न करता मागे फिरावे लागले. दक्षिण-मध्य मुंबई हा सगळ्यात महत्वाचा लोकसभा मतदारसंघ आहे. या मतदारसंघांमध्ये शिवसेनाविरुद्ध शिवसेना, अशी लढाई बघायला मिळत आहे. येथे शिंदे गटाचे उमेदवार राहुल शेवाळे आणि ठाकरे गटाचे अनिल देसाई या दोघांमध्ये थेट लढत होणार आहे.



दोन्ही नेते आपला प्रचार करत आहेत. मात्र अनिल देसाई यांना प्रचार करताना विरोधाला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे हा विरोध महाविकास आघाडीतील कार्यकर्तेच करत असल्याने अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. दक्षिण-मध्य मुंबई लोकसभा

## ठाकरे गटाच्या अनिल देसाईंना काँग्रेस कार्यकर्त्यांचा विरोध

मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार अनिल देसाई हे चेंबूर पांजर पोळ परिसरात प्रचारासाठी गेले होते. परंतु तेथे त्यांना विरोधाला सामोरे जावे लागले. तेथील स्थानिक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांना विरोध केला. त्यावेळी ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. त्यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांना तेथून निघून जाण्यास सांगितले.

## घाटकोपरमध्ये पेट्रोल पंपाला आग

**प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईतील घाटकोपर येथील छेडा नगर परिसरात जाहिरात फलक कोसळून दुर्घटना घडली होती. ही घटना घडल्याच्या ४० तासांनंतर बचावकार्य सुरु आहे. या ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन सुरु असताना पेट्रोल पंपाला आग लागली. बुधवारी सकाळी आग लागल्याने प्रशासकीय यंत्रणेची धावपळ उडाली होती.कारण या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सीएनजी गॅस आणि पेट्रोल पंप आहेत.

## अजित पवारांच्या कार्यामुळे मतदार प्रभावी : देवेंद्र फडणवीस

**प्रतिनिधी, मुंबई**



अजित पवारांची राष्ट्रवादी जेव्हा भाजपाच्या नेतृत्वातील महायुतीत सहभागी झाली तेव्हा भाजपा समर्थक नाराज झाले होते असा गौप्यस्फोट देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. तसंच शिवसेनेसह झालेली युती भावनिक असून, राष्ट्रवादीसह झालेली युती राजकीय असल्याचंही ते म्हणाले आहेत.

देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं की, अजित पवार महायुतीत आले तेव्हा आमचा मतदार नाराज झाला. मात्र अजित पवारांच्या वर्तनाने महायुतीचा अवमान होणार नाही याची त्यांना खात्री पटली. तुम्हाला बारामतीच्या निकालात याचा प्रत्यय येईल. खडकवासला येथील भाजपाचे मतदार कोणाला मतदान करतात यावरुन तुम्हाला समजेल.

शरद पवारांच्या मूळ राष्ट्रवादीचा विचार केला तर त्यांची कोणतीही विचारधारा नाही. आम्हाला त्यांच्या विचारसरणीशी काही हरकत नाही, आम्हाला तुष्टीकरणाची समस्या आहे. जिथे साधनसंपत्तीवर हक्क मुस्लिमांचा आहे असे म्हटले जाते. आमच्या म्हणण्यानुसार, जात-धर्मांचा विचार न करता पहिला हक्क गरिबांचा आहे.

ठाणे मतदारसंघ न मिळाल्याने भाजपा समर्थक नाराज असल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, कोणत्याही पक्षाला आपल्याला जास्त जागा मिळाव्यात असं वाटणं साहजिक आहे. आम्हाला ३० जागांची अपेक्षा होती, पण २८ मिळाल्या. आम्ही ठाणे मिळण्यासाठी आग्रही होतो. पण मुख्यमंत्री म्हणाले की, ही जागा आम्ही सातवेळा जिंकली आहे. जर मी आनंद दिघेंचा मतदारसंघ जाऊ दिला तर माझ्या समर्थकांचे खच्चीकरण होईल. आम्ही ठाण्यासाठी आग्रह करु नये अशी त्यांनी विनंती केली.

## दक्षिण मुंबई– मतदार माझ्या कामाची पावती देतील – यामिनी जाधव

**प्रतिनिधी, मुंबई**

एकेकाळी मराठी भाषक बहुल मतदारसंघ म्हणून दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघ ओळखला जात होता. फेररचनेत या मतदारसंघाचा शिवडीपर्यंत विस्तार झाला आहे. कुलाबा, मुंबादेवी, मलबार हिल, वरळी, भायखळा आणि शिवडी असे सहा विधानसभा मतदारसंघांचा दक्षिण मुंबई मतदारसंघ बनला आहे.



गेल्या काही वर्षात मराठी टक्का कमी झाला असला तरी तोही आज महत्त्वाचा घटक आहे. परराज्यांतून नोकरी-व्यवसायानिमित्त आलेले अनेकजण या मतदारसंघात वास्तव्यास आहेत. तसेच अल्पसंख्यांकाची संख्याही लक्षणीय आहे. त्यामुळे आता या मतदारसंघात संमिश्र लोकवस्ती आहे. नगरसेवक वा आमदार झाल्यानंतर उच्चभ्रू आणि गरीबांच्या वस्त्यांमध्येही काम केले. त्यावेळी एखाद्या विशिष्ट समाजाला डोळ्यासमोर ठेवून काम केलेले नाही. त्यामुळे मतदार मला माझ्या कामाची मताच्या रुपात नक्कीच पोचपावती देतील.

दक्षिण मुंबईमध्ये मुख्य बाजारपेठा, शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालयांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने अनेक नागरिक दूरवरून दक्षिण मुंबईत येतात. त्यामुळे केवळ इथे वास्तव्यास असलेल्या नागरिकांनाच नव्हे, तर नोकरी-व्यवसायानिमित्त येणाऱ्यांनाही चांगल्या सुविधा मिळणे गरजेचे आहे. निवडून आल्यानंतर केंद्र सरकार दरबारी या आर्थिक केंद्राचे स्थान जगभरात उंचावे यादृष्टीने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जुन्या जिर्ण झालेल्या उपकरप्राप्त आणि उपकरप्राप्त नसलेल्या असंख्य इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न, वाहने उभी करण्यासाठी आवश्यक असलेली वाहनतळे, आरोग्याच्या दर्जेदार सुविधा, महिलांचे निरनिराळे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल. पुनर्विकासात जुन्या इमारतीच्या तळमजल्यावरील दुकानदारांना फारसा फायदा होत नाही.





**उद्धव ठाकरेंनी बेईमानी केली; फडणवीसांचा घणाघात**

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांचा बूरखा फाडत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंवर घणाघात केला आहे. फडणवीस म्हणाले की, 'उद्धव ठाकरे हे भाजपासह युती करुन विधानसभेची निवडणूक २०१९ मध्ये निवडून आले. उद्धव ठाकरेंचे फोटो तेव्हा स्टँपसाईज आणि मोदींचे फोटो लाइफसाईज असायचे. सगळ्या निवडणूक प्रचारात मोदींचे फोटो लावून ते निवडून आले. तसेच त्यावेळी प्रचारसभांमध्ये नरेंद्र मोदी, अमित शाह, जे.पी. नड्डा हे सगळे सांगायचे की देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील. त्यावेळी उद्धव ठाकरे त्यांच्या सभांमधून हेच सांगायचे. पण निकालाचा दिवस उजाडला आणि संख्याबळ समोर आले तेव्हा त्यांना लक्षात आले की गणित बसणार नाही. उद्धव ठाकरेंनी राष्ट्रवादीला निवडणुकीच्या आधीच बरोबर घेतले होते. ती तयारी अशासाठी होती की थोडे भाजपाला खाली आणू. पण संख्याबळ पाहिले तशी उद्धव ठाकरेंनी बेइमानी केली. त्यानंतर ते काँग्रेस राष्ट्रवादीबरोबर गेले आणि त्यांनी सरकार स्थापन केले.' ही बेईमानीच आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

**'आम्हीही कच्चे खिलाडी नाही;' उज्वल निकम यांचे सूचक वक्तव्य**

काँग्रेसने मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी दिली आहे. त्यावर बोलताना उज्वल निकम म्हणाले होते की, प्रतिस्पर्धी उमेदवार वैयक्तिक शत्रू नसतात. उमेदवार त्यांच्या विचारधारेवर लढतात. त्या अनुभवी आणि ज्येष्ठ राजकारणी आहेत, पण 'आम्हीही कच्चे खिलाडी' नाही. निवडणुकांमध्ये लोक पाहतात आणि ठरवतात की, विशिष्ट राजकीय पक्ष देशासाठी काही चांगले करू शकतो की नाही. आम्ही पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या सरकारने देश मजबूत करण्यासाठी केलेल्या कामाचे अनुसरण करू. निकम यांची ही प्रतिक्रिया अतिशय सूचक अशी आहे. निवडणुकीच्या राजकारणाचा अनुभव नसला तरी आमची बलस्थाने आम्हाला ठावूक आहेत आणि त्या जोरावर समोरच्याला धोबीपछाड दिला जाईल, असाच निकम यांच्या वक्तव्याचा मतितार्थ आहे.

**राहुल शेवाळे करणार विजयाची हॅट्ट्रिक**

धनुष्यबाणातून मतांचा असा वर्षाव होणार आहे की, त्याने मशाल विझणार आहे, असेच चित्र सध्या दिसत आहे. राहूल शेवाळे मोठे मताधिक्य घेत विजयाची हॅट्रिक करणार आहेत. कारण त्यांचे कामच तसे आहे. राहुल शेवाळे यांनी मागील दहा वर्षांत मतदारसंघातील एसआरएच्या प्रकल्पांबाबत पाठपुरावा केला. आपण नगरविकास मंत्री असताना पुनर्विकासाचे नियम शिथिल केले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल शेवाळे यांच्या प्रचारसभेत म्हटले. एमएमआरडीए, म्हाडा, एमएसआरडीसी, एमआयडीसी या संस्थांच्या माध्यमातून रखडलेले प्रकल्प पूर्ण केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. पुनर्विकासाचे रखडलेले प्रकल्प पूर्ण केले जातील. बेघर झालेल्या मुंबईकराला हक्काचे घर देण्याचे काम आपले हे सरकार करेल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. त्यासाठी राहुल शेवाळे यांना तिसऱ्यांदा संधी द्यायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी मतदारांना केले आहे.

**मिहीर कोटेचा यांचा सर्वांगीण विकासाचा ध्यास**

लवकरच मुंबईला एक नवीन पर्यटन स्थळ मिळणार असून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जुन्या तीन मूर्ती मंदिरासाठी रोपवे (केबल कार) बांधण्यात येणार आहे. तसेच त्याच्या निसर्गरम्य सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी एक पर्यटन केंद्र विकसित केले जाणार आहे. मुलुंडचे आमदार आणि मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघातील भाजप-महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांनी तशी मागणी केली असून, सरकारने पर्यटन विभागाला त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितला आहे. कोटेचा हे मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून काम करत आहेत. त्यांनी हाती घेतलेल्या काही मुद्द्यांमध्ये मुलुंड येथील बर्ड पार्क, भांडुप आणि विक्रोळीवासीयांसाठी मराठी सांस्कृतिक केंद्र, जिल्हा क्रीडा संकुल, डंपिंग ग्राउंड कायमस्वरूपी बंद करणे, कोकणातील रहिवाशांसाठी रेल्वे टर्मिनस बांधणे आदींचा समावेश आहे.

**विकासकामांचा आशीर्वाद यामिनी जाधवांच्या पाठिशी**

प्रतिष्ठेच्या मुंबई दक्षिण मतदारसंघातील एनडीएच्या उमेदवार यामिनी जाधव या मतदारसंघात आक्रमकपणे प्रचार करत आहेत. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, राज्यमंत्री मंगल प्रभात लोढा आणि माजी खासदार मिलिंद देवरा यांसारख्या मतदारसंघातील प्रमुख नेत्यांनी त्यांच्यासाठी एकजुटीने प्रचार केल्याने जाधव यांच्या प्रचाराला बळ मिळाले आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या गटाला सहानुभूती मिळेल अशी जी चर्चा आहे त्यातील हवाच यामिनी जाधव यांनी काढली आहे. त्या म्हणाल्या की, 'लोक सहानुभूतीच्या लाटेवर जगू शकत नाहीत. त्यांच्यासाठी विकास आवश्यक आहे आणि पंतप्रधान मोदींनी देशासाठी काय केले हे आपल्या सर्वांना माहीत आहे. मी माझ्या मतदारसंघात सुरू केलेल्या विकासकामांचा मला आशीर्वाद आहे.'

**पियूष गोयलांना मुंबईकर भरभरून देणार मताचे दान!**

दिल्लीत पियूष गोयल यांच्या शब्दाला वजन आहे. गोयल बोले, दिल्ली डोले, अशी परिस्थिती आहे. केंद्रीय मंत्री असताना गोयल यांनी मुंबईला खूप काही दिले. यापुढेही ते मुंबई आणि राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. सध्याचे चित्र पाहता गोयल यांचा विजय निश्चित मानला जात आहे. त्यांचा फक्त लीड मोजायचा आहे. त्यामुळेच महायुतीकडून इथल्या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे, जेणेकरून विक्रमी मताधिक्य पियूष गोयल यांच्या नावावर नोंदवले जाईल. गोयल यांनी आपल्या कार्यशैलीने दिल्लीतील पक्षश्रेष्ठींची मने कधीच जिंकली आहेत. म्हणूनच त्यांना जनतेच्या दरबारात उतरवण्याचा निर्णय पक्षाने घेतला. हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी पियूष गोयल यांच्या पाठीशी मुंबईकर जनता ठामपणे उभी असल्याचेच दिसते आहे.

**रवींद्र वायकरांच्या विजयाचा मार्ग सोपा!**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना मत म्हणजे विकासाला मत, देशाच्या प्रगतीला मत, महासत्तेला मत आहे. त्यामुळे उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांना आपण दिलेले मत हे मोदींना मिळणार आहे. मोदींचे हात बळकट करण्यासाठी वायकर यांना मतदान करा असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. या मतदारसंघात अमित साटम, डॉ. भारती लव्हेकर, विद्या ठाकूर आणि स्वतः वायकर असे चार आमदार असून हा महायुतीचा बालेकिल्ला आहे. वायकर यांनी तीन वेळा आमदारपद भूषवले आहे. त्यांनी जोगेश्वरीचा विकास केला असून त्यांना या लोकसभा मतदारसंघाचा विकास करायचा आहे. त्यांची काम करण्याची पद्धत माहीत असल्यामुळे जनता त्यांच्या सोबत आहेच. त्याचवेळी महायुतीतील इतर घटक पक्षांचे बळही वायकरांचा विजय सोपा करणार आहे.

## राज्यात १२ जूनपर्यंत मान्सून बरसणार

**प्रतिनिधी, मुंबई**

मागील काही दिवसांपासून राज्यात नागरिक उकाड्याने हैराण झाले आहे. सर्वजण पावसाची आतुरतेने वाट पाहात आहेत. राज्यात मान्सून केव्हा हजेरी लावणार? हा प्रश्न सगळ्यांच्या ओठावर आहे. या संदर्भात मान्सूनची आनंदवार्ता समोर येत आहे. राज्यात १२ जूनपर्यंत मान्सूनचे आगमन होणार असल्याची माहिती मिळाली आहे. ही राज्यातील पावसासंदर्भात मोठी अपडेट आहे. सर्वजण वरूणराज्याच्या प्रतिक्षेत आहे.

नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या हालचालींवरून हे संकेत मिळाले आहेत. १९ मेपर्यंत नैऋत्य मान्सून अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहेत. तर १९ मेपर्यंत मान्सून भारतात येईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. यावरून महाराष्ट्रामध्ये मान्सून १२ जून रोजी दाखल होऊ शकतो, असा हवामान विभागाने अंदाज व्यक्त केला आहे. आता काही दिवसांतच राज्यात मान्सून धडकणार आहे.

३० जून रोजी दिल्लीत तर त्याअगोदर १० जून रोजी चेन्नईमध्ये मान्सूनची शक्यता वर्तविली जात आहे. भारतात यंदा मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडू शकतो, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. आयएमडीने मे महिन्याच्या सुरुवातीला सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज देखील वर्तवला होता. दक्षिणेकडील राज्य तमिळनाडू, कर्नाटक आणि केरळमध्ये पुढील दोन दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू राहू शकतो. बंगालच्या उपसागरामधून भारताकडे मान्सून सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे लवकरच मान्सून राज्यात धडकणार आहे. यावर्षी जास्त पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

## मतदानापूर्वी महायुतीकडून राज ठाकरेंवर मोठी जबाबदारी

**प्रतिनिधी, मुंबई**

महायुतीकडून राज ठाकरेंना मोठी जबाबदारी देण्याची शक्यता आहे. कारण भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे राज ठाकरेंच्या भेटीसाठी 'शिवतीर्थ येथे राज ठाकरे यांची भेट घेणार आहेत. मुंबई लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेट असल्याची माहिती समोर आली आहे.

मनसेने महायुतीला बिनशर्त पाठींबा दिल्यानंतर महायुतीच्या उमेदवारांसाठी राज ठाकरे सभा घेत आहेत. ठाण्यात आणि कोकणात राज ठाकरेंच्या सभा झाल्या आहेत. आता १७ मे ला पंतप्रधान नरेंद्र मोदींची सांगता सभा मुंबईत शिवाजी पार्कवर होणार आहे. या सभेला मनसे प्रमुख राज ठाकरे देखील उपस्थित राहणार आहेत. मनसेने पाठींबा जाहीर केल्यानंतर मनसेचे पदाधिकारी सध्या महायुतीच्या उमेदवारासाठी काम करत आहेत. १७ मे रोजी मोदी आणि राज ठाकरे हे एकाच व्यसपीठावर असणार आहे. त्यावेळी ते काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवाजी पार्कवर होणाऱ्या या सभेची मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडे महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली आहे. मुंबईतील सहा जागांसाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. मुंबईत मनसेची ताकद तेवढीच महत्त्वाची आहे. मराठी मताचा टक्का हा मनसेकडे देखील आहे. त्यामुळे मराठी मतांची जबाबदारी मनसेच्या खांद्यावर देण्यात आली आहे.मुंबईतील प्रत्येक जागा निवडून आणायची असेल तर मराठी मते ही तेवढीच महत्त्वाची आहेत. प्रचारासाठी अवघे दोन दिवस शिल्लक आहेत. मुंबईत प्रचार कशा प्रकारे करायचे आहे. मराठी मतापर्यंत कसे पोहचायचे याची रणनीती या बैठकीत ठरण्याची शक्यता आहे.

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सामाजिक संघटनांचा पुढाकार

**प्रतिनिधी, मुंबई**

भारतीय संविधानिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी मतदारांनी सजग आणि निर्भय मतदान करावे, यासाठी 'मुंबईत निर्भय बनो' जाहीर सभा घेण्यात आली. ही सभा दुभाषी मैदान, गुजरात सोसायटी रोड, विलेपार्ले पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सामाजिक संघटना सरसावल्याचे दिसून आले. सभेमध्ये सामाजिक क्षेत्रातील मान्यवर ज्येष्ठ वकील असीम सरोदे, डॉ. विश्वंभर चौधरी, सामाजिक कार्यकर्ते ललित बाबर आणि सीताराम शेलार यांनी मार्गदर्शन केले. सध्या लोकसभा निवडणुकीचा उत्सव सुरू आहे. निवडणुकीचे चार टप्पे पार पाडले असून पाचवा टप्पा येऊ घातला आहे. मुंबईतील मतदानही पाचव्या टप्प्यात २० मे रोजी होत आहे. आतापर्यंत झालेल्या मतदानाची टक्केवारी पाहिली तर ती घसरत असल्याचे दिसते.

# पोस्टर्स, झाडांच्या पतनाचे कारण

### रासायनिक प्रक्रिया करून वृक्षांचा बळी घेतला जातो

**प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईमध्ये ठिकठिकाणी एक हजार २५, तर रेल्वेच्या हद्दीत १७९ महाकाय फलक उभे आहेत. महापालिका आणि रेल्वेच्या हद्दीतील फलकांसाठी अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची बेमालुमपणे छाटणी करण्यात येते. तर काही ठिकाणी रासायनिक प्रक्रिया करून वृक्षांचा बळी घेतला जात आहे.

मुंबईतील मुख्य रस्ते, उड्डाणपूल, इमारतींच्या आवारात महाकाय फलक उभारण्यात आले आहेत. त्यावर झळकविण्यात येणाऱ्या जाहिराती दूरवरून दृष्टीस पडाव्यात यासाठी बराच आटापीटा करण्यात येतो. अनेक ठिकाणी रस्त्यांच्या मध्यभागी, दुभाजकांवर लावण्यात आलेली झाडे बहरतात आणि त्यामुळे जाहिरातींचे फलक झाकोळले जातात. त्याचबरोबर पदपथांवर



बहरलेले वृक्षही या फलकांना अडथळा निर्माण करतात. वृक्षांच्या अडथळ्यामुळे फलकांवरील जाहिराती दूरवरून दिसत नाहीत. त्यामुळे फलक दिसण्यात अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची वारंवार छाटणी करण्यात येते. पावसाळ्यात रस्त्यालगतचे, खासगी भूखंडावरील व वृक्ष बहरतात. अशा वृक्षांच्या मुळावर आता फलक उठले आहेत. काही वृक्षांच्यावर रासायनिक प्रक्रिया करण्यात येते.

मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे पदपथावर वृक्षारोपण करण्यात येते. काही वर्षांतच वृक्ष मोठे होतात. डेरेदार वृक्ष लगतच्या इमारतींमधील पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यांवरील रहिवाशांसाठी डोकेदुखी ठरतात. वृक्षांच्या फांद्या खिडकी, सज्जापर्यंत पोहोचतात. तसेच दुकानदारांनाही हे वृक्ष नकोसे होतात. वृक्षांमुळे दुकानावरील पाटी, जाहिरात ग्राहकांच्या नजरेआड होते. त्यामुळे चुना अथवा अन्य रासायनिक द्रव्याचे पाणी खोडाजवळ टाकण्यात येते. काही वेळा खोडावर छिद्र करून इंजेक्शनच्या साह्याने वृक्षामध्ये रासायनिक द्रव्य सोडले जाते. यामुळे वृक्ष सुकत जातो आणि मरणपंथाला लागतो. अशा प्रकारे मुंबईत अनेक ठिकाणी वृक्षांनी मान टाकली आहे.

**iStreet Network Limited**
**CIN L51900MH1986PLC040232**
107, Sonal Industrial Estate Linking road, Malad West, Mumbai 400064
Email: info@istreetnetwork.com
Website: www.istreetnetwork.com

**NOTICE**

Pursuant to the provisions of Regulation 47 read with Regulation 29 and 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, 21st May 2024 inter-alia to, consider and approve, the audited Financial Results for the Quarter and year end March 31, 2024.

The Notice is also available on the website of the Company i.e., www.istreetnetwork.com and on the website of BSE Ltd www.bseindia.com

For **iStreet Network Limited**
Sd/-
Surabhi Pal
Company Secretary
Place: Mumbai
Date: 14.05.2024

# Campaigning picks up in 13 Maharashtra Lok Sabha constituencies

Mumbai, May 15 (UNI) : The din and bustle of election campaigning is gradually reaching a crescendo across the remaining 13 Maharashtra constituencies including those in this financial capital and the adjacent districts slated to vote in the fifth phase of the Lok Sabha elections on May 20.

So far, 35 out of the 48 seats in the state have gone to the hustings.

Apart from the half a dozen seats in the western metropolis - Mumbai South, Mumbai North, Mumbai North West, Mumbai North East, Mumbai North Central and Mumbai South Central – the poll caravan will also move to Thane, Bhiwandi, Kalyan, Phalghar, Nashik, Dindori and Dhule Monday next.

Altogether 264 candidates are in the fray for the 13 constituencies Including union ministers Piyush Goel (BJP-Mumbai North), Bharti Pawar (BJP-Dindori) and Kapil Patil (BJP, Bhiwandi), former union minister Dr Subhash Bhamre (BJP-Dhule), Arvind Sawant (UBT-Mumbai South), Anil Desai (UBT- Mumbai South Central), Varsha Gaikwad (Congress-Mumbai North Central), Rajan Vichare (UBT-Thane), Ravindra Vaikar (Shinde Sena-Mumbai North West). Prominent lawyer Ujwal Nikam (BJP-Mumbai North Central) and Shobha Bachav (Congress -Dhule).

With the campaigning picking up, allegations and counter-allegations are flying thick and fast between the main contenders Mahayuti (Grand Alliance comprising BJP, Shinde Sena and the Ajit Pawar-led NCP group – all part of the NDA bloc) and Maha Vikas Agadhi (comprising Congress, Uddhav Thackeray led UBT and the Sharad Pawar-headed NCP-SCP – all part of the INDIA bloc).

Prakash Ambedkar's Vanchit Bahujan Agadhi and the AIMIM, as well as some of the smaller parties, have put up candidates in some of the constituencies.

With only three days left for the campaigning to end on May 18, Prime Minister Narendra Modi is addressing election meetings in Pimpalgao and Kalyan, besides holding a road show in the evening in the Ghatkopar area of suburban Mumbai Suburban in support of the Mahayuti candidates.

On May 17, Modi will address a rally with top Mahayuti leaders including Chief Minister Eknath Shinde and Deputy Chief Ministers Devendra Fadnavis and Ajit Pawa in Mumbai .

On the other hand, UBT chief Uddhav Thackeray is busy campaigning in various areas in Mumbai and its suburbs in support of MVA aspirants. On Wednesday evening, Thackeray is slated to address a meeting in the Nashik constituency in support of his party nominee Rajabhau Waje.

The grand old man of Maharashtra politics and NCP-SCP chief Sharad Pawar is also attending an election rally in Wani of Dindori constituency in support of his party nominee Bhaskar Bhagare.

Chief Minister Eknath Shinde and his Deputy Devendra Fadnavis have also lined up meetings in several constituencies.

Among other prominent leaders, MNS Chief Raj Thackeray, NCP-SCP leader Jayant Patil, MPCC president Nana Patole, UBT leader Aditya Thackeray, VBA chief Prakash Ambedkar are among the other star campaigners.

More than average 60 percent polling was recorded during the last four phases of election in the state.

## Over 1600 water tankers providing drinking water in 7 dists

Chhatrapati Sambhajinagar, May 15 (UNI) : The Marathwada region's potable water shortage is escalating due to insufficient rainfall and the drying up of water resources. Currently, 1691 water tankers are providing water to 1149 affected villages and 441 hamlets.

An official report released by the Divisional Commissioner office here on Wednesday stated that up to May 12, a total 1691 water tankers were engaged in the service to supply water in thirsty villages in seven districts.

Out of 1691 tankers, 656 are serving 405 villages and 61 hamlets in Chhatrapati Sambhajinagar district, while 475 are supplying water to 324 villages and 74 hamlets in Jalna district.

382 water tankers serve 308 villages and 282 hamlets in Beed, whereas 129 tankers are supplying water to 37 villages in Dharshiv, 21 tankers in 18 villages and 4 hamlets in Latur district, 16 tankers in 3 villages and 13 hamlets in Nanded district, and 12 in 8 villages and 7 hamlets in Parbhani district. However, no tankers are currently in the Hingoli district of the region, indicating a lack of water supply.Meanwhile, authorities have acquired a total of 2607 wells, so far to fill up the tankers with drinking water purpose , the report added.



Wreckage of the vehicles that were damaged after a 100-foot tall illegal billboard fell on a petrol pump on Monday due to rains and duststorm, in Ghatkopar area of Mumbai. At least 14 persons were killed and 76 others injured in the accident, according to officials.

## Spontaneous response of citizens to voter awareness campaign implemented at Thane railway station: EC

Thane, May 15 (UNI) : Voter awareness was created among the commuter voters at Thane railway station on Tuesday that every voter should do their national duty by voting in order to actively participate in the strengthening of democracy and increase the voter turnout.

According to the official press statement issued on Wednesday by the EC, it stated that, under the Thane-Lok Sabha Constituency, the Thane Vidhan Sabha Constituency.

Under the guidance of Election Decision Officer Urmila Patil, a voter literacy campaign was implemented in the Thane Railway Station area.

On this occasion, the employees of the Thane Assembly Constituency SVEEP Team actually went to every platform of Thane Railway Station and interacted with the passengers. There was a huge crowd at the railway station. It included youth, men and women, disabled citizens, and senior citizens.

The SVEEP team appealed to all eligible voters to vote and strengthen the democratic system in the Lok Sabha elections to be held on May 20 in Thane city.

Senior citizens and disabled citizens are an important part of democracy. It was informed that facilities have been provided at every polling station so that senior citizens and disabled people do not face any trouble at the polling station. It was also said on this occasion that citizens can call 1950 for any doubts, clarifications, and complaints and clear their doubts.

In the celebration of democracy, on the day of voting, the present citizens were given an oath to put aside all their work to exercise their right to vote for a brighter future, strengthen democracy, and vote on May 20 without fail, the statement added.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY MINOR DAUGHTER OLD NAME: **TAMANNABANU FAKIRMOHAMMED** MY MINOR DAUGHTER NEW NAME: **TAMANNABANU FAKIRMOHAMMED PATHAN** FATHER SD : **PATHAN FAKIRMOHAMMED KALUKHAN** ADDRESS: FLAT-204, BUILDING-F,ROYAL RESIDENCY, NAVSARI MAIN ROAD,UNN, SURAT-395003.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME FROM **MANSURI MOHAMMED MOHSIN MOHAMMED ZUBER** TO NEW NAME **MANSURI MOHMMED MOHSIN MOHMMED ZUBER** & I WILL BE KNOWN AS NEW NAME WHICH PLEASE NOTE SD: **MANSURI MOHMMED MOHSIN MOHMMED ZUBER** ADD: 11/2121, DHASTIPURA KHAN SAHEB , NU. BHATU, SURAT - 395003.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY BEFORE MARRIAGE OLD NAME FROM **NILOFARBANU MOHAMMAD FARUK KAPADIYA** TO AFTER MARRIAGE NEW NAME: **NILOFAR BEGUM ABDUL KADAR SAIYED** & I WILL BE KNOWN AS NEW NAME WHICH PLEASE NOTE : **NILOFAR BEGUM ABDUL KADAR SAIYED** ADDRESS: 2/3016, SINDHIWAD, SAGRAMPURA, SURAT - 395002, GUJARAT.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY BEFORE MARRIAGE OLD NAME FROM **HALIMABIBI MOHAMMED NASIR ARAB** TO AFTER MARRIAGE NEW NAME: **AREFABANU MOHAMED ARIF JARIWALA** & I WILL BE KNOWN AS NEW NAME WHICH PLEASE NOTE : **AREFABANU MOHAMED ARIF JARIWALA** ADDRESS: 1/3632/A/B, 3RD FLOOR, NOOR MAHAL, DHINGLI FALIA, BADEKHA CHAKLA, SURAT-395003, GUJARAT

## Gwalior 'Rajmata' Madhavi Raje passes away

Gwalior, May 15 (UNI) : Madhavi Raje Scindia (70), the queen mother of the Gwalior royal family and mother of Union Minister Jyotiraditya Scindia, passed away on Wednesday.

Her last rites will be performed with traditional rituals in Gwalior Thursday afternoon. Sources close to the Scindia family informed that she breathed her last at 9.28 am at the All India Institute of Medical Sciences (AIIMS), New Delhi. Her family members were with her during that time.

Scindia, wife of former Union Minister Madhav Rao Scindia, was unwell for the last three months and was undergoing treatment at AIIMS for about two months. Her condition was critical over the last two weeks and she was on ventilator.

She belonged to the Rana dynasty of Nepal. The head of this dynasty was Juddha Shumsher Jang Bahadur Rana, who was also the Prime Minister of Nepal.She was married to the then Maharaja of Gwalior Madhav Rao Scindia on May 8, 1966. Before becoming the daughter-in-law of the Scindia royal family, her name was Kiran Raj Lakshmi.

**HDFC BANK**

**HDFC BANK LIMITED**

**Branch: Fourth Floor, MSR Block, Krishe Sapphire, Hitech City Main Road, Madhapur, Hyderabad-500 081**
**Tel: 040-64807999, CIN L65920MH1994PLC080618, Website: www.hdfcbank.com**

**POSSESSION NOTICE**

Whereas the Authorised Officer of **HDFC Bank Limited** (erstwhile HDFC Limited having amalgamated with HDFC Bank Limited by virtue of a Scheme of Amalgamation approved by Hon'ble NCLT-Mumbai vide order dated 17th March 2023) **(HDFC),** under the Securitisation And Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 ("said Act") and in exercise of powers conferred under Section 13 (12) read with Rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issued Demand Notices under Section 13 (2) of the said Act, calling upon the following borrower(s) to pay the amounts mentioned against their respective names together with interest thereon at the applicable rates as mentioned in the said notices, within 60 days from the date of the said Notice/s, incidental expenses, costs, charges etc till the date of payment and / or realisation.

| Sl. No. | Name of Borrower (s) | Outstanding Dues | Date of Demand Notice | Date of Possession | Description of Immovable Property (ies) / Secured Asset (s) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Mr Chinthalapally Praveen Kumar Reddy (Borrower)** | **Rs. 38,84,085/-** (Rupees Thirty Eight Lakh Eighty Four Thousand and Eighty Five Only) due as on **31-OCT-2023*** | **01-DEC-2023** | **09-MAY-2024 (Symbolic Possession)** | All that piece and parcel of the House on Plot No.17 Middle Part, admeasuring 189 Sq. Yards or 158.02 Sq Mtrs., and having plinth area of 1155 Sq. Feet or 107.30 Sq. Meters of R.C.C., in Survey Nos.122 Situated at Almasguda Village, Balapur Mandal, Ranga Reddy District, Under Badangpet Nagar Panchayath, and bounded by: **North :** Part of, Plot No.17 Northern Part, **South :** Part of Plot No.17 Southern Part, **East :** 20' Wide Road, **West :** Neighbours Land. |

*with further interest as applicable, incidental expenses, costs, charges etc incurred till the date of payment and / or realisation.

However, since the borrower/s mentioned hereinabove have failed to repay the amounts due, notice is hereby given to the borrower/s mentioned hereinabove in particular and to the public in general that the Authorised Officer/s of HDFC have taken Symbolic possession of the immovable property (ies) / secured asset(s) described herein above in exercise of powers conferred on him/them under Section 13 (4) of the said Act read with Rule 8 of the said Rules on the dates mentioned above.

The borrower(s) in particular and the public in general are hereby cautioned not to deal with the aforesaid Immovable Property(ies) / Secured Asset(s) and any dealings with the said Immovable Property (ies) / Secured Asset(s) will be subject to the mortgage of HDFC.

Borrower(s) attention is/are invited to the provisions of sub-section (8) of section 13 of the Act, in respect of time available to redeem the secured asset/s.

**Date: 14-MAY-2024**
**Place: Hyderabad**

**For HDFC Bank Limited**
**Sd/-**
**Authorised Officer**

**Regd. Office: HDFC Bank House, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai- 400013**

**iStreet Network Limited**

**CIN L51900MH1986PLC040232**
107, Sonal Industrial Estate Linking road, Malad West, Mumbai 400064
Email: info@istreetnetwork.com
Website: www.istreetnetwork.com

**NOTICE**

Pursuant to the provisions of Regulation 47 read with Regulation 29 and 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, 21st May 2024 inter-alia to, consider and approve, the audited Financial Results for the Quarter and year end March 31, 2024.

The Notice is also available on the website of the Company i.e., www.istreetnetwork.com and on the website of BSE Ltd www.bseindia.com

For **iStreet Network Limited**
**Sd/-**
**Surabhi Pal**
**Company Secretary**

**Place: Mumbai**
**Date: 14.05.2024**

**Format C-2**

**DECLARATION ABOUT CRIMINAL ANTECEDENTS OF CANDIDATES SET UP BY THE PARTY**

*(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.).*

Name of Political Party : **BAHUJAN SAMAJ PARTY**
Name of Election : **Lok Sabha General Election 2024 PHASE-5**
Name of State/UT : **MAHARASHTRA**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sl. No.** | **Name of Constituency** | **Name of Candidate** | **(A) Pending criminal cases** | | **(B) Details about cases of conviction for criminal offences** | | |
| | | | **Name of Court, cases No. & status of the case(s)** | **Sections of the Acts concerned & brief description of offence(s)** | **Name of Court & date(s) of order(s)** | **Description of offence(s) & punishment imposed** | **Maximum Punishment Imposed** |
| 1. | 21- NASHIK | ARUN MADHUKAR KALE | Diwani Court Nashik SCC No 5658/2022 REG No. 3272/2022 (Pending) | Section 143 & Section 135 of Mumbai Police Act | N.A | N.A | N.A |
| | | ARUN MADHUKAR KALE | FIR No. 52/2022 Satpur Police Station (Pending) | Section 269, 270, 188 of IPC & Section 131, 135, 394, 341, 506, 34 Of Mumbai Police Act & Section 51 of Disaster Management Act | N.A | N.A | N.A |
| | | ARUN MADHUKAR KALE | FIR No. 146/2006 Satpur Police Station (Pending) | Section 143, 144, 147, 341, 324, 427 Of IPC & Section 135 r/w Sub section 7 of Mumbai Police Act | N.A | N.A | N.A |
| | | ARUN MADHUKAR KALE | FIR No. 186/2008 Satpur Police Station (Pending) | Section 143, 147, 148, 149, 324, 323, 504, 506 427 of IPC | N.A | N.A | N.A |
| 2. | 27- MUMBAI NORTH-WEST | RAJESH RAMKISAN MALLAH | 26th M M Court Borivali FIR No. MECR-04/2012 (Pending) | Section 324, 394, 354 452 467, 506 (ii) 34 IPC | N.A | N.A | N.A |